# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 09/06/2023 (शुक्रवार) दुपार

---

### घरफोडी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत मनसर येथे दिनांक ०७/०६/२०२३ चे १५.३० वा. २३.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— कृष्णकुमार रामद्याल धावळे, वय ३३ वर्ष, रा. वार्ड नं. १ वसंत नगर मनसर हे डॉक्टर असुन दिनांक ०७/०६/२०२३ रोजी ०८/३० वा. घराला कुलुप लावुन मनसर येथे दवाखान्यात गेले असता दुपारी ०२/३० वा. जेवन करण्याकरिता घरी आले असता दुपारी जेवन करून ०३/०० वा. दरम्यान परत दवाखान्यात गेले असता रात्री अंदाजे ०८/३० वा. मनसर येथील मेडीकल स्टोअर्स मध्ये गेले असता रात्री १०/०० वा. मेडीकल बंद करून मित्राकडे जेवन करणेकरिता गेले असता जेवन करून रात्री ११/१५ वा. दरम्यान घरी गेले असता घराचे गेटचे कुलुप तुटलेले दिसले घरात आत प्रवेश केला असता आलमारीमधील जुने वापरते सोन्याचे मंगळसुत्र १५.५५० ग्रॅम किंमती ६५,०००/—रूपये जुनी वापरती सोन्याची अंगठी ४ ग्रॅम किंमती १७०००/— चांदीच्या पायपट्ट्या आणि १ नग जोडवे ६४ ग्रॅम किंमती अंदाजे ३०००/—रूपये असा एकुण ८५,०००/—रूपयांचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने घराचे दरवाजाचे लॉंक तोडुन चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पांडे पोस्टे. रामटेक मो. नं. ८३०८५९७७९९ हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. रामटेक** :— दिनांक ०७/०६/२०२३ चे १२.३० वा. ते दिनांक ०८/०६/२०२३ चे १४.०० वा. चे सुमारास पो.स्टे. रामटेक हद्दीत फिर्यादी व त्यांची पत्नी हे मालक यांचे घरी कामावर गेले असता फिर्यादीचा मुलगा वय १३ वर्ष हा एकटाच घरी हजर होता. फिर्यादी व त्याची पत्नी हे ०४.०० वा. कामारून घरी परत आले असता मुलगा हा घरी दिसुन आला नाही. आजुबाजुला व नातेवाईक यांचेकडे शोध घेतला असता मिळुन आला नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे मुलाला पालकाचे कायदेशिर ताब्यातुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोनटक्के पोस्टे. रामटेक मो. नं. ७९७२३५८०२ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर